# सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय,

**शासकीय तंत्र निकेतन परिस्र, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३**

E-mail:-roamravati.dte@gmai .com Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७

Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७९१३


क्रमांक :- विकाअ/शिक्षण/इतिवृत्त/२०१२/६८८

दिनांक :- १६/०३/२०१२.

**दिनांक १५/०३/२०१२ रोजी विभागातील सर्व शासकीय / अनुदानित / विनाअनुदानित संस्थेतील प्राचार्यांची आयोजित करण्यात आलेल्या बैठकीचे इतिवृत्त.**

**संदर्भ :-** या कार्यालयाचे पत्र क्र. विकाअ/शिक्षण/सॅप/२०१२/६४१, दिनांक १३/३/२०१२.

या कार्यालयांतर्गत विभागातील सर्व शासकीय / अनुदानित / विनाअनुदानित संस्थेतील प्राचार्यांची सहसंचालकांचे अध्यक्षतेखाली दिनांक १५/०३/२०१२ रोजी आयोजित बैठकीत सोबतचे यादी प्रमाणे संस्थेचे प्राचार्य / प्रतिनिधी तसेच तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती येथील कॉन्फरन्स हॉल मध्ये उपस्थित होते. सदरहु बैठकीमध्ये सॅप (SAP) अभ्यासक्रमाबाबत माहिती देण्याकरीता श्री. मयंक शर्मा, मेसर्स, मेलन टेक्नॉलॉजी प्रा.लि. मुंबई हे उपस्थित होते.

सर्व प्रथम सहसंचालकांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सभेचा अजेंडा सर्वांना सांगण्यात आला तद्नंतर सहसंचालकांनी सॅप अभ्यासक्रमाबाबत शासनाचे व संचालनालयाचे धोरण बैठकीस उपस्थित सर्व अधिकारी यांना विषद केले. तद्नंतर श्री. मयंक शर्मा, मेसर्स, मेलन टेक्नॉलॉजी प्रा.लि मुंबई यांनी सॅप अभ्यासक्रमा बाबत विस्तृत माहिती सभागृहाला पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन व्दारा सादर केली. तद्नंतर बैठकीस उपस्थितांचे प्रश्नांचे शंका समाधान झाल्यानंतर खालील प्रमाणे कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले.

१) विभागातील सर्व संस्थांनी अल्पसंख्याक तसेच इतर विद्यार्थ्यांची सदर SAP अभ्यासक्रमाकरीता दिनांक १८/०३/२०१२ पर्यंत तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाकडे नोंदणी करावी जेणेकरुन ती तंत्र शिक्षण संचालनालय, म. राज्य, मुंबई यांना दिनांक २१/०३/२०१२ पर्यंत सादर करता येईल.

२) विभागातील प्रा. राम मेघे इंन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी बडनेरा. जवाहरलाल दर्डा अभियांत्रिकी महाविद्यालय यवतमाळ, संत गजानन महाराज अभियांत्रिकी महाविद्यालय शेंगाव, अनुराधा अभियांत्रिकी महाविद्यालय चिखली, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय अमरावती, शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती/यवतमाळ/वाशिम या संस्थांनी तसेच इतर इच्छुक / बहु अल्पसख्यांक विद्यार्थी असलेल्या संस्थांनी पुढाकार घेऊन सदर कार्यक्रम त्यांचे संस्थेत घेण्यासंदर्भात श्री. मयांक शर्मा, मेसर्स, मेलन टेक्नॉलॉजी प्रा.लि. मुंबई यांचेशी संपर्क साधुन या कार्यालयाचे माध्यमातुन सुरु करण्याबाबत कळविले.

३) सदरहू अभ्यासक्रमाकरीता एक बॅच कमीत कमी ५० विद्यार्थ्यांची असावी.

४) सदरहू अभ्यासक्रमाची प्रत्येक जिल्हयात ३ ते ४ प्रशिक्षण केंद्रे असावीत.

Created with nitroPDF professional
download the free trial online at nitropdf.com/professional

SAP अभ्यासक्रमाबाबतचे मुद्यांनंतर तंत्रशिक्षण विभागातील या कार्यालयाशी संबंधित असलेल्या खालील मुद्यांवर चर्चा झाली व पुढील प्रमाणे सुचना देण्यात आल्यात.

१. **वृक्ष लागवड** :- महाराष्ट्र राज्य शासनाचे धोरणानुसार मा. विभागीय आयुक्त व मा. जिल्हाधिकारी अमरावती यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे विभाअंतर्गत येणा-या सर्व संस्थांनी झाडे लावण्याचा उपक्रम हाती घ्यावा. याची पूर्व तयारी तात्काळ सुरु करावी, यामध्ये शासकीय नर्सरीमध्ये रोपांचे आरक्षण नोंदवीणे, झाडे लावण्याकरीता खड्डे खोदणे,पुढे पाण्याची व्यवस्था करणे इत्यादी तसेच याबाबत दर आठवडयाला प्रत्येक शुक्रवारी / शनिवारी या कार्यालयास ई-मेल / पत्राव्दारे अहवाल सादर करणे. सदर कामाबाबत आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात / विभागीय आयुक्तालयात दर सोमवारी / मंगळवारी होत असते. तेव्हा सदर माहिती वेळीच सादर करणे आवश्यक आहे. तसेच सदर कामाचे निरिक्षण करण्याकरीता आयुक्तालय / जिल्हाधिकारी कार्यालय / तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती येथील अधिकारी केव्हाही संस्थेस भेट देऊ शकतात. तेव्हा याबाबत सतर्क असावे. सदर वृक्षारोपणाचे काम सामाजिक असल्याने समाजसेवेचे असते. सर्व संस्थांनी याबाबत सहकार्य करावे असे आवाहन करण्यात आले आहे.

२. **ईबीसी अर्ज तपासणी / छाणनी** :- या कार्यालयाव्दारा विभागातील सर्व विनाअनुदानित संस्थेतील आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे ई.बी.सी. सवलतीचे अर्ज मंजुरीची कार्यवाही होत असते. या करीता अर्ज छाणनीच्या वेळी संस्थांकडुन प्राप्त अर्जात भरपुर त्रृटी असतात. याचा अर्थ संस्थास्तरावर अर्जांची छाणनीच होत नाही किंवा योग्य प्रकारे छाणनी करण्यात येत नाही. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या अर्जांची योग्य प्रकारे छाणनी करीता सादर केलेले अर्ज या कार्यालयाव्दारा तपासण्यात येतात तेव्हा अतिशय गंभीर त्रृटी आढळतात. जसे, कॅप मध्ये नसलेले विद्यार्थी, जास्त उत्पन्न असलेले विद्यार्थी, उत्पन्नाचा दाखला न लावलेले, कितवे अपत्य आहे हे नमूद नसणे इत्यादी सदर अर्जांची संचालनालयाव्दारा सुध्दा तपासणी होते तेव्हा अनेक संस्था त्यांना कळवुन सुध्दा गैरहजर असतात. तसेच या तपासणीत अपात्र विद्यार्थ्यांना ई.बी.सी. मंजुर झाली असल्यास वसुलीचे जिकरीचे काम करावे लागते. यात वेळ व मनुष्यबळ वाया जाते. तेव्हा यापुढे सर्व संस्थांनी विशेषतः प्राचार्यांनी सर्व अर्जांची छाणनी झाली आहे याची खात्री करुनच अर्ज या कार्यालयास सादर करण्यात यावे, याबाबत सुचित करण्यात आले.

३. **गुणवत्ता सुधार / एन.बी.ए. :-** सर्व पात्र संस्थांनी एन.बी.ए. करीता अर्ज करावा तसेच गुणवत्ता सुधारण्याकरीता उच्च शैक्षणिक अर्हता प्राप्त योग्य शिक्षकांची नियुक्ती करावी. तसेच ए.आय.सी.टि.ई. च्या मानकानुसार शिक्षकेत्तर कर्मचारी १:१.५ या प्रमाणात आणि १.५ पैकी ०.९ तांत्रिक / शैक्षणिक व ०.६ कार्यालयिन कर्मचारी वर्ग असावा. या सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वर्गाला महाराष्ट्र राज्य शासनाचे धोरणाप्रमाणे प्रशिक्षणास पाठवावे. तसेच संस्थेतील सर्व पदे नियमित स्वरुपात भरलेली असावीत, असे उपस्थितांनी त्यांचे संस्थेचे व्यवस्थापनास गुणवत्ता सुधारण्याकरीता कसे आवश्यक आहे, हे सांगावे, जेणेकरुन संस्थेतील सर्व पदे भरल्या जातील.

४. **रोजगार उपलब्धी** :- सर्व संस्थांनी विशेषतः पदविका संस्थांनी त्यांचे विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्याकरीता विविध कंपनीशी संपर्क साधून कॅम्पस घेण्यात यावे. तसेच आपले विद्यार्थी उद्योगामध्ये जास्तीत जास्त कसे स्विकारले जातील याबाबत संस्थेत कार्यवाही करावी.

Created with
nitroPDF professional
download the free trial online at nitropdf.com/professional

५. **अल्पसंख्याक शिष्यवृत्ती व त्या बाबतच्या तक्रारी** :- केंद्र व राज्य शासनाने अल्पसंख्याक विद्यार्थ्याकरीता शिष्यवृत्तीची योजना कार्यावित केली आहे. तथापि, काही विद्यार्थी सदर योजनेपासुन वंचित राहतात अशा तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. या करीता संस्था जबाबदार असुन यापुढे असे होऊ नये याकरीता विशेष काळजी घेणे अत्यावश्यक आहे. तेव्हा संस्थास्तरावर या करीता एक समिती स्थापन करुन सर्व संबंधित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे , त्यांचे अर्ज भरुन घेणे योग्य कागदपत्र अर्जास लावणे, अर्ज / कागदपत्रांची छाणनी करणे, अर्ज ऑनलाईन भरणे येणा-या अडचणीचे निवारण करणे पाठपुरावा करणे इत्यादी कामे समितीने करणे अपेक्षित आहे. तसेच प्राचार्यांनी सुध्दा स्वत: जातीने या प्रकरणी लक्ष घालुन एकही विद्यार्थी सदर योजनेपासुन वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी, असे सुचित करण्यात आले.

६. **नविन प्रशिक्षण प्रणाली** :- दिनांक ५/०३/२०१२ रोजी औरंगाबाद येथे मा. राजेशजी टोपे, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्री महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत मा. डॉ. मंथा, अध्यक्ष ए.आय.सी.टी.ई. यांनी सांगितलेले माहितीप्रमाणे राज्यात The National Vocational Education Qualification Framework (NVEQF) प्रकल्प येत आहे. यामध्ये विद्यार्थी सात लेव्हल मध्ये पदवी कशी मिळवु शकतो **(याबाबतचे सहा पानांचे डॉक्युमेंट सभेत वितरीत करण्यात आले आहे. तसेच ते या कार्यालयाचे संकेतस्थळावर उपलब्ध आहे)** या बाबतची माहिती सभागृहात देण्यात आली.

७. **महाराष्ट्र राज्याचे प्रशिक्षण धोरण** :- सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्रमांक :- टिआरएन-०९/प्र.क्र.३९/०९/१२-अ, दिनांक २३/०९/२०११ प्रमाणे राज्यात सर्व विभागात सर्व अधिकारी / कर्मचारी वर्गास प्रशिक्षण देऊन राज्यात गुणवत्तेचा दर्जा सुधारणेचा कार्यक्रम शासणाने जाहिर केला आहे यामध्ये यशदा पुणे येथे झालेल्या सभेच्या अनुषंगाने तसेच उपरोक्त शासन निर्णयाचे अनुषंगाने २ वर्ष , ४ वर्ष , ११ वर्ष, २५ वर्ष पुर्ण झालेल्या अद्यापक तथा कर्मचारी वर्गाकरीता प्रशिक्षण आयोजित करण्यात येईल. त्याप्रशिक्षणास तसेच विविध प्रशिक्षणसंस्थांत अयोजित होत असलेल्या प्रशिक्षणास संबंधितास प्रशिक्षणास पाठविणे अनिवार्य आहे. कोणत्याही परिस्थितीत प्रक्षिणाचा लाभ समाजाला / विद्यार्थ्यांना व्हावा या हेतुने सदर कार्यवाही प्रस्तावित आहे.

शेवटी बैठकीस उपस्थित सर्व अधिकारी / कर्मचा-यांचे आभार व्यक्त करुन सभा संपल्याचे जाहिर करण्यात आले.

**(प्र.वि. सरोदे)**
सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रतिलिपी :-** १. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबइ यांना माहितीकरीता सादर.
२. सर्व संस्था अध्यक्ष/सचिव यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता.
३. सर्व संस्था संचालक / प्राचार्य यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता.
४. प्रक्रिया योजक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना सदरहु इतिवृत्त तात्काळ संकेतस्थळी टाकण्याकरीता.

Created with nitroPDF professional
download the free trial online at nitropdf.com/professional

दिनांक १५/०३/२०१२ रोजी विभागातील सर्व शासकीय / अनुदानित / विनाअनुदानित संस्थेतील प्राचार्यांची आयोजित करण्यात आलेल्या बैठकीस उपस्थित असलेले अधिकारी / कर्मचारी

| | | | |
|---|---|---|---|
| **Joint Director, Technical Education Regional Office, Amravati** | | Shri P.V. Sarode | Joint Director |
| | | Shri S.V. Sakhalkar | Ast. Director |
| | | Smt. N.V. Ramteke | Adm. Officer |
| Sr. No. | **Engineering** | | |
| 1 | Government College of Engineering, Amravati | D.J. Choudhari | Principal |
| 2 | Shri Sant Gajanan Maharaj College of Engineering,Shegaon | Dr.V.N. Gahokar | Principal |
| 3 | V.Y.W.S's Prof. Ram Meghe Institute of Technology & Research, Amravati | Dr. D.S. Ingole | Principal |
| 4 | Maratha Shikshan Sanstha, P.R. Patil College of Engineering & Technology, Amravati | Dr. D.R. Wakde | Director |
| 5 | Shri Shivaji Education Society's College of Engineering and Technology, Akola | Mr. G.B. Suralkar | Ast. Professor |
| 6 | Paramhansa Ramkrishna Maunibaba Shikshan Santha's Anuradha Engineering College, Chikhali | Dr. M.V. Kadu | Ast. Professor |
| 7 | Jawaharlal Darda Institute of Engineering and Technology, Yavatmal | Dr. Dinesh Chandhari | Professor |
| 8 | Shri Hanuman Vyayam Prasarak Mandals College of Engineering & Technology, Amravati | Dr. A.B. Marathe | Principal |
| 9 | Dr. Bhausaheb Nadurkar College of Engineering, Waghapur,Yavatmal | Dr. S.G. Akalwar | Principal |
| 10 | Indira Bahuuddeshiya Shikshan Sanstha, College of Engineering, Ghatkheda, Amravati | Dr. N.N. Gedam | Ast. Professor |
| 11 | Chaitanya Bahu Uddeshiya Sanstha, College of Engineering and Management, Anjangaon, Amravati | Dr. P.N. Ingole | Principal |
| 12 | Dhamangaon Education Society's College of Engineering and Technology, Dhamangaon | Shri.G.R. Pande | Jr. Cleark |
| 13 | Sanmati Engineering College, Sawargaon Barde, Washim | Shri. S.L. Swabandhe | Lecturer |
| 14 | Bhonsla College of Engineering & Reasearch, Akola | Shri. R.L. Kadhane | Representive |
| 15 | Mauli Group of Institutions, College of Engineering and Technology, Shegaon. | Shri. Y.G. Mirge | Cleark |
| | **Polytechnic** | | |
| 16 | Government Polytechnic, Murtijapur | Shri. S.R. Thute | Principal |
| 17 | Shree Shivaji Education Society's Dr. Punjabrao Deshmukh Polytechnic, Amravati | A.B. Sangole | HOD |
| 18 | Government Polytechnic, Amravati | Shri. S.P. Paseband | HOD |
| | | Shri. M.A. Ali | HOD |
| | | Dr. V.R. Mankar | HOD |
| 19 | Government Polytechnic, Khamgaon | Shri. A.A. Gulhane | Principal |
| 20 | Government Polytechnic, Washim | Shri. S.B. Ghuge | Principal |
| 21 | Government Residential Women's Polytechnic, Yavatmal | Shri. R.A. Pranjale | HOD |

Created with
nitroPDF professional
download the free trial online at nitropdf.com/professional

| | | | |
|---|---|---|---|
| 22 | Government Polytechnic, Yavatmal | Shri. R.P. Mogre | Principal |
| 23 | Saraswati Education Society's Shree Tirupati Tantra Niketan, Akola | Shri. S.P. Kulkarni | Administer |
| 24 | Shree Shivaji Education Society's Dr. Panjabrao Deshmukh Girls Polytechnic, Amravati | Shri. M.H. Chore | Principal |
| 25 | Dhamangaon Education Society's L.A.M.I.T. Dhamangaon Rly, Amravati | Shri. A.S. Bhuyar | Principal |
| 26 | Janata Shikshan Prasarak Mandal's Dr.N.P.Hirani Polytechnic, Pusad | Shri. A.S. Gadewar | Lecturer |
| 27 | Vidarbha Youth Welfare Society's Polytechnic, Badnera, Amravati | Shri. R.M. Deshmukh | Principal |
| 28 | Nagar Parishad Polytechnic, Nagar Parishad Achalpur, Amravati | Shri. P.M. Bhansali | Principal |
| 29 | Bhaiyasaheb Javade Education Society, Amravati Polytechnic College, Bhankhed, Amravati | Dr. S.D. Sawarkar | Principal |
| 30 | Chaitanya Bahuuddeshiya Sanstha's, G. H. Raisoni Polytechnic, Anjangaon, Amravati | Shri. P.P. Wankhade | Principal |
| 31 | Rambhauji Lingade Polytechnic College, Buldhana | Shri. V.P. Suradkar | Cleark |
| 32 | P.R. Pote (Patil) Education & Welfare Trust, P. R. Pote Institute Of Polytechnic & Technology, Amravati | Shri. M.G. Rahutgoarkar | HOD |
| 33 | Vidarbha Rural Reconstruction Foundation's, Rajeshkumar Wadhawan Polytechnic Institute, Yavatmal | Shri. M.G. Bhurghate | Cleark |
| 34 | Sakshi Shikshan Krida Prasarak & Bahu Sanstha's Dr. Rajesh Ramdasji Kambe Polytechnic, Turkhed, Tal: Murtizapur Dist: Akola | Shri. S.K. Dahibhat | Principal |
| 35 | Indira Bahuuddeshiya Shikshan Sanstha's Dr. Rajendra Gode Polytechnic,Ghatkhed, Amravati | Shri. A.V. Akhare | Principal |
| 36 | Nav Vidya Niketan Shiksha Santha Nav Vidya Niketan Institute of Technology,Mardi Road, Amravati | Shri. A.M.Dabhade | Lecturer |
| 37 | Bhonslas Education Trust's Bhonsla Polytechnic, Akola-Washim Highway, Tah. & Dist. Akola | Shri. R.L. Kadhane | Principal |
| 38 | Paramhans Ramkrishna Mouni Baba Shikshan Sanstha's Anuradha Polytechnic, Anuradha Nagar,Chikhali, Buldhana | Shri. N.S. Solanki | Lecturer |
| | **Degree Pharmacy** | | |
| 39 | Government College of Pharmacy, Amravati | Shri. V.K. Morya | Principal |
| 40 | J.S.P Mandal's Sudhakarrao Naik Institute of Pharmacy, Yavatmal | Dr. V.N. Deshmukh | Associate Prof. |
| 41 | Vidya Bharati College of Pharmacy, Amravati | Shri. A.W. Baitule | Ast. Professor |
| 42 | Anuradha College Of Pharmacy, Chikhli | Shri. K.B. Charhate | Lecturer |
| 43 | Yavatmal Zilla Vikas Samitee's Pataldhamal Wadhwani College of Pharmacy, Yavatmal | Shri. C.K. Gadewar | Ast. Professor |
| 44 | Shri Gurudatta Shikshan Prasarak Sanstha's Institute of Pharmacy, Kaulkhad, Akola | Shri. N.S. Bhajipale | Principal |
| 45 | Indira Bahuuddeshiy Shikshan Sanstha's College of Pharmacy,Malkapur | Shri. R.S. Sangole | Cleark |
| | **Diploma Pharmacy** | | |
| 46 | Geetadevi Khandelwal Institute of Pharmacy, Akola | Shri. Ramesh Alkari | O.S. |
| 47 | Shikshan Prsarak Mandal's Institute of Pharmacy, Wani | Dr. Sudhakar Reddy | Principal |

Created with
nitroPDF professional
download the free trial online at nitropdf.com/professional

| | | | |
|---|---|---|---|
| 48 | Shri Chhatrapati Shahumaharaj Shikshan Santha's Institute Of Pharmacy, Maregaon | Dr. N.O. Chachda | Principal |
| 49 | Paramhansa Ramkrishna Maunibaba Shikshan Santha's Anuradha College of Pharmacy, Chikhali | Shri. K.B. Charhate | Lecturer |
| 50 | Shri Gurudatta Shikshan Prasarak Sanstha's Late Shri Ramraoji Gawande Institute Of Pharmacy, Akola | Shri. N.S. Bhajipale | Principal |
| 51 | Vidarbha Institute of Pharmacy, Washim. | Shri. A.K. Dhamankar | ICC |
| **MBA** | | | |
| 52 | Vidya Bharati Mahavidyalaya Department of Research and PG Studies in Science & Management, Amravati | Dr. S.A. Telang | HOD |
| 53 | Maratha Shikshan Sanstha, P.R. Patil College of Management, Amravati | Shri. S.R. Shah | Ast. Professor |
| 54 | Hari Kishan Jaju Education Sanstha's.College of Management & Computer Science, Yavatmal | Shri. A.B. Tekade | Ast. Professor |
| 55 | Chaitanya Bahu Uddeshiya Sanstha's Institute of Management Studies, Anjangaon, Amravati | Dr. P.N. Mondaogade | Director |
| **MCA** | | | |
| 56 | Dr.Babasaheb Nandurkar College of Physical Education, Yavatmal | Santosh Satumkar | Lecturer |
| 57 | Sadhana Shikshan Mandal, Saraswati College, Shegaon | Shri. D.P. Kare | Principal |
| 58 | Harkisan Maloo Institute of Managment & Technology, Amravati | Shri. L.V. Mate | Principal |

**Joint Director,**
Technical Education,
Amravati

Created with
nitroPDF professional
download the free trial online at nitropdf.com/professional